# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

---

- कवितेचे शीर्षक : - सप्तसूर
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. माणिक कौलगुड

---

ही आळवणी सुरांची
की दरवळ धूपारतीचा
सूरच झाले ईश्वरी लय
ही मैफिल की देवालय / १

जागवाया येई गोपाळा
भूपाळी शांत लडिवाळ
साज भरून येता केशरी
मारव्याची सरगम हुरहुरती /२

सप्तरंगात सप्तसूर चितारती
नक्षीदार वेलबुट्टी स्वरांची
दोले सुराचे झुलती मानसी
पखरण मनी आनंद कणांची / ३

तानपुरे नव्हे, सखी हे अंतर्नाद
तालचक्र सूरांशी तदाकार बोल
संवादिनीतून झरती स्वर अनुगामी
अन् तानांची बरसात घालती भूल / ४

चैतन्यमय माहोल झंकारलेला
नादिर दिन तालात तराणा
कळस दिसे मज स्वरमंदिराचा
अवघा भाव दाटला चिन्मयाचा / ५

Anahat Music Therapy

# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

या नादरंगात चिंब भिजावे
शब्द गुंफून स्वरात माळावे
मन पिसापरी हल्लक व्हावे
सुरांच्या फुकरीने मनाने फुलावे ! / ६

Anahat Music Therapy